# संत जोजेफ को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र. टी.एन.ए. (व्ही.एस.आय.)आर.एस.आर. (सी.आर.) ४२३/८६-८७
स्थापना : २३ जुलै १९८६
कृपा अपार्टमेंट, सागरशेत - तारभाट, पो. पापडी, ता. वसई, जि. पालघर - ४०१ २०७.

## ३८ वा वार्षिक अहवाल - सन २०२३-२४

### ✯ ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ✯

ह्या नोटीसीद्वारे सर्व सन्माननीय सभासदांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची **अडतिसावी** वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ठीक ४.३० वाजता 'कृपामाता सभागृह', थॉमस बॅप्टिस्टा हायस्कूल, पापडी, वसई** येथे खालील विषयांवर आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर हजर राहावे ही विनंती.

### ✯ सभेपुढील विषय ✯

१) दिनांक १७ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.

३) संचालक मंडळाने सादर केलेल्या सन २०२३-२०२४ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.

४) सन २०२२-२०२३ वर्षाच्या लेखापरीक्षण दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

५) संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२४-२०२५ च्या अंदाज पत्रकास (उत्पन्न व खर्च) मान्यता देणे.

६) सन २०२३-२०२४ अखेरच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे. (लेखापरिक्षण अहवाल मुख्य कार्यालयात अवलोकनार्थ उपलब्ध आहे.)

७) मा. निबंधकाने जाहीर केलेल्या नामतालिकेमधून सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मेहेनताना ठरविणे.

८) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत हिशेब तपासनीसाची नेमणूक करणे व त्यांचा मेहेनताना ठरविणे.

९) सामोपचार कर्ज परतफेड योजनेअंतर्गत बंद केलेल्या कर्ज खात्यांची नोंद घेणे तसेच महत्तम कर्ज धारण करणाऱ्या कर्जदारास सामोपचार कर्ज परतफेड योजना लागू करणेबाबत.

१०) माननीय सभाध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

ठिकाण : सागरशेत, वसई-४०१ २०७
दिनांक : २०-७-२०२४

संचालक मंडळाच्या वतीने
**पिटर डायगो डिसोजा**
महाव्यवस्थापक

---

### ✯ सूचना ✯

(१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास, सदर ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी त्याच विषयावर अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

(२) सभासदांस ३८ व्या वार्षिक अहवालातील सभेपुढील विषयासंबंधी माहिती अगर लेखी प्रश्न विचारावयाचे असल्यास ते दि. १५-९-२०२४ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत पाठवावेत.

(३) ज्या सभासदांनी अजूनही वारस नेमले नसतील त्यांनी आपले वारस नेमून घ्यावेत. तसेच आपले बदललेले पत्ते मुख्य कार्यालयात अथवा संस्थेच्या शाखेमध्ये लेखी स्वरूपात त्वरीत कळविणे आवश्यक आहे. तसेच ज्या सभासदांनी KYC निकषांचे पालन केले नसेल त्यांनी पालन करणे आवश्यक आहे. KYC फॉर्म सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहेत.

(४) अहवालाची प्रत संस्थेच्या **www.sjccs.co.in** ह्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

# संत जोजेफ को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र. टी.एन.ए. (व्ही.एस.आय.)आर.एस.आर. (सी.आर.) ४२३/८६-८७

स्थापना : दि. २३ जुलै १९८६

कृपा अपार्टमेंट, सागरशेत - तारभाट, पो. पापडी, ता. वसई, जि. पालघर - ४०१ २०७.

## ✯ संचालक मंडळ ✯

## सन २०२३ ते २०२८

| | | |
|---|---|---|
| १) | **श्री. लिनस निकलस डिकुना** | चेअरमन |
| २) | **श्री. संजय बाळकृष्ण वर्तक** | व्हा. चेअरमन (इतर मागास वर्ग, राखीव गट) (दि. २५-२-२०२४ पासून) |
| ३) | **श्री. जेम्स सेबेस्टीयन घोन्सालविस** | व्हा. चेअरमन (दि. २४-२-२०२४ पर्यंत) |
| ४) | **श्री. जेम्स अँथनी लोपीस** | संचालक |
| ५) | **श्री. ऑल्वीन जोसेफ बंदेर** | संचालक |
| ६) | **श्री. राजेश जाकोल दात्या** | संचालक |
| ७) | **श्री. विजय संज्याव भंगा** | संचालक |
| ८) | **अ‍ॅड. सौ. उर्मिला ऑलिव्हर परेरा** | संचालिका (महिला राखीव) |
| ९) | **सौ. लता आसिस रॉड्रीग्ज** | संचालिका (महिला राखीव) (दि. २३-३-२०२४ पर्यंत) |
| १०) | **श्री. अशोक महादेव चोपडे** | संचालक (भटक्या विमुक्त जाती-जमाती, राखीव गट) |
| ११) | **श्री. पिटर डायगो डिसोजा** | तज्ज्ञ संचालक (दि. २३-३-२०२४ पर्यंत) |

**श्री. हेमंत पांडुरंग माळी**
सहा. महाव्यवस्थापक

**श्री. पिटर डायगो डिसोजा**
महाव्यवस्थापक

**मे. किरण शिंदे अ‍ॅण्ड कं.**
चार्टर्ड अकौंटंट
अंतर्गत लेखापरिक्षक

**मे. सुवर्णा गोखले अ‍ॅण्ड कं.**
चार्टर्ड अकौंटंट
वैधानिक लेखापरिक्षक

# संत जोजेफ को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

कृपा अपार्टमेंट, सागरशेत – तारभाट, पो. पापडी, ता. वसई, जि. पालघर – ४०१ २०७.

## ☆ ३८ वा वार्षिक अहवाल ☆

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

सप्रेम नमस्कार,

आपल्या संस्थेचा ३८ वा वार्षिक अहवाल दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा नफा तोटा पत्रक व ताळेबंद आपणांस सादर करीत आहोत. आपली संस्था अनेक प्रकारच्या संक्रमणातून वाटचाल करीत आहे. विद्यमान संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग व सभासदांच्या सहकार्याने दिवसेंदिवस संस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. आपल्यासमोर संस्थेचे येणे असलेली कर्जे व त्यावरील येणे असलेले व्याज वसूल करणे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. त्याअनुषंगाने आपण सतत प्रयत्नशील राहिल्यामुळे त्याचे परिणाम सकारात्मकतेच्या दिशेने दिसून येत आहेत. गतवर्षी सन २०२२-२३ मध्ये आपणांस रु. ७४,५२,४९१.५५ इतका तोटा झाला होता. अहवाल साली तो रु. ४९,१५,४७१.५० रकमेने कमी होऊन अहवालसाली तोटा रु. २५,३७,०२०.०५ इतका झालेला आहे, ही एकंदरीत समाधानाची बाब आहे. आपला एकूण संचित तोटा रु. ३,७६,८८,२८३.२४ इतका झालेला आहे. त्यावर आपण नजीकच्या काळात मात करून आपली संस्था नफ्यामध्ये येईल असा आम्हांला रास्त विश्वास आहे. त्यासाठी आपणा सर्वांकडून सहकार्य व योगदानाची आम्ही अपेक्षा करतो.

### अ ) सभासद संख्या व भाग भांडवल

अहवाल साली सभासद संख्या व धारण भागभांडवलाची स्थिती खालील प्रमाणे :

| तपशील | सभासद संख्या | भाग भांडवल |
|---|---|---|
| दि. ३१ मार्च २०२३ अखेरीस सभासद संख्या | १०,६५२ | रु. ३१,३७,९३९०.०० |
| अहवाल सालात झालेली वाढ | १४० | रु. ६,४३,९५०.०० |
| एकूण | १०,७९२ | रु. ३,२०,२३,३४०.०० |
| भाग हस्तांतर व राजीनाम्यामुळे कमी झालेले सभासद | ५५ | रु. ३,८३,८७०.०० |
| दि. ३१ मार्च २०२४ अखेरीस सभासद संख्या | १०,७३७ | रु. ३,१६,३९,४७०.०० |

### ठेवी

अहवाल साली सभासद ठेवीमध्ये १२.५५% घट होऊन दि. ३१-३-२०२४ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. २७,८२,८२,१५५.६५ झाल्या आहेत. ठेवींची विगतवारी खालील प्रमाणे :

| अ. क्र. | ठेव प्रकार | ३१-३-२०२३ अखेरची ठेव रक्कम रुपये पैसे | ३१-३-२०२४ अखेर ठेव रक्कम रुपये पैसे | अहवाल वर्षातील वाढ / घट (+/-) रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | बचत ठेव | ५,९२,६८,९९६.७५ | ५,९७,५३,२८८.४१ | + ४,८४,२९१.६६ |
| २ | आवर्त ठेव | ७८,५७,२९२.९० | ५६,६७,५१३.९० | - २१,८९,७७९.०० |
| ३ | मुदत ठेव | २५,०७,०१,५४४.०० | २१,२४,४४,६४६.०० | - ३,८२,५६,८९८.०० |
| ४ | दामदुप्पट ठेव | १२,१६३.०० | १२,१६३.०० | ---- |
| ५ | चालू ठेव | ३,७२,३४९.३४ | ४,०४,५४४.३४ | + ३२,१९५.०० |
| | **एकूण** | **३१,८२,१२,३४५.९९** | **२७,८२,८२,१५५.६५** | **-३,९९,३०,१९०.३४** |

आम्ही सभासदांस आश्वस्त करू इच्छितो की, संस्थेची आर्थिक स्थिती सुधारण्याची प्रक्रीया सुरू झाली आहे. विद्यमान संचालक मंडळ आपणांस आपल्या संस्थेबरोबरच्या सर्व प्रकारच्या व्यवहाराबाबत ठाम विश्वास व भरवसा देऊ इच्छितो की, आपल्या ठेवी तसेच इतर व्यवहाराबाबत आपण निर्धास्त असावे. तसेच पूर्वी जो विश्वास आपला संस्थेबरोबर होता, तो व्यक्त करून संस्थेबरोबर व्यवहार सुरू करावेत.

## कर्ज वितरण

अहवाल साली दि. ३१ मार्च २०२४ अखेर कर्जामध्ये १.५५% घट होऊन एकूण कर्ज रक्कम रुपये २२,४२,९१,८३०.०० झालेली आहे. कर्ज खात्यांची विगतवारी खालील प्रमाणे आहे :

| अ. क्र. | कर्जाचा प्रकार | ३१-३-२०२३ अखेरचे कर्ज रुपये पैसे | ३१-३-२०२४ अखेरचे कर्ज रुपये पैसे | अहवाल वर्षातील वाढ / घट (+/-) | रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | जामिनकी कर्ज | ६,५७,८१,४९४.०० | ६,०७,३९,१७६.०० | - | ५०,४२,३१८.०० |
| २ | दागिना कर्ज | ५९,०२,६६४.०० | ५१,५५,७१७.०० | - | ७,४६,९४७.०० |
| ३ | ठेव कर्ज | ३७,१४,३२७.०० | २७,१२,७०४.०० | - | १०,०१,६२३.०० |
| ४ | गहाण कर्ज | ४,३४,९४,६३०.०० | ४,६०,१६,३१६.०० | + | २५,२१,६८६.०० |
| ५ | वाहन कर्ज | ८,९५,७९,३५७.०० | ८,९०,९८,४५९.०० | - | ४,८०,८९८.०० |
| ६ | कॅश क्रेडिट कर्ज | १,२५,१५,२२१.०० | १,२५,१५,२२१.०० | | ---- |
| ७ | हायपोथिकेशन कर्ज | १४,९९,६३५.०० | १४,२१,६०२.०० | - | ७८,०३३.०० |
| ८ | स्टाफ कर्ज | ५३,४२,७६१.०० | ६६,३२,६३५.०० | + | १२,८९,८७४.०० |
| | **एकूण** | **२२,७८,३०,०८९.००** | **२२,४२,९१,८३०.००** | **-** | **३५,३८,२५९.००** |

## थकबाकी

अहवाल वर्षी एकूण थकबाकी रु. १६.७९ कोटी असून त्याचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण ७४.८५% इतके आहे. एन.पी.ए.ची रक्कम रु. १८.२१ कोटी इतकी असून त्याचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण ८१.१७% इतके आहे. संस्थेकडे दि. ३१-३-२०२४ अखेर एन.पी.ए.ची एकूण तरतूद रु. ९.२५ कोटी आहे.

## अनुत्पादक मालमत्ता वर्गीकरण

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संस्थेने अनुत्पादक कर्ज खात्यांचे वर्गीकरण केलेले असून त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे :

| अ. क्र. | अनुत्पादक मालमत्ता वर्गीकरण | खाती | येणे रक्कम ( रु. ) |
|---|---|---|---|
| १ | समाधानकारक कर्जे (Standard) | २०३ | ४,२२,२३,९३८.०० |
| २ | असमाधानकारक कर्ज (Substandard) | ६० | ८८,१२,९०३.०० |
| ३ | संशयित कर्ज -१ (Doubtful 1) | ११३ | १,०४,३९,१६९.०० |
| ४ | संशयित कर्ज -२ (Doubtful 2) | ८४ | १,५५,३३,२५७.०० |
| ५ | संशयित कर्ज -३ (Doubtful 3) | १,७४० | १४,२०,१५,६१२.०० |
| ६ | बुडीत कर्जे (Loss) | १७० | ५२,६६,९५२.०० |
| | **एकूण** | **२,३७०** | **२२,४२,९१,८३१.००** |

अहवाल साली लवाद दाव्यामार्फत वसूलीसाठी जी कारवाई करण्यात आली त्या प्रकरणांची विगतवारी खालील प्रमाणे आहे :

| अ.क्र. | तपशील | प्रकरणे | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ३१ मार्च २०२३ अखेर १०१ ची असलेली प्रकरणे | १,३२४ | १४,८१,५२,१७२.०० |
| २ | सन २०२३-२४ मध्ये नवीन दाखल केलेली १०१ ची प्रकरणे | १४ | १७,२२,४३८.०० |
| **३** | **एकूण** | **१,३३८** | **१४,९८,७४,६१०.००** |
| ४ | सन २०२३-२४ या वर्षात पूर्ण वसूल झालेली प्रकरणे | ५६ | ५८,६५,३११.०० |
| ५ | सन २०२३-२४ या वर्षात अंशतः वसूल झालेली प्रकरणे | ९१ | ३५,४७,३२४.०० |
| ६ | सन २०२३-२४ या वर्षात एकूण वसूली | १४७ | ९४,१२,६३५.०० |
| ७ | दि. ३१-३-२०२४ अखेर प्रलंबित प्रकरणे | **१,२८२** | **१४,०४,६१,९७५.००** |

## वसूली

कर्ज वसूलीशिवाय आपल्याकडे कोणताही पर्याय नाही. कर्ज वसूली प्रभावीपणे होण्यासाठी आपण विविध मार्ग अवलंबविलेले आहेत. जास्तीत जास्त कलम १०१ प्रकरणे तयार करणे, कर्ज सामोपचार योजनेमध्ये (ओटीएस) प्रकरणे निकाली काढणे, थकीत कर्जदार व जामिनदार ह्यांना भेटी देणे इत्यादी मार्ग आपण अवलंबवित आहोत. त्यासाठी आपण दोन टू व्हिलर खरेदी केल्या असून त्याचा वसूलीकामी चांगला उपयोग होत आहे.

## शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे कर्ज सामोपचार योजना

आपल्या संस्थेने सहकार खाते मान्य कर्ज सामोपचार योजना स्वीकारलेली आहे. अहवाल साली ह्या योजनेचा लाभ ६१ कर्जदारांनी घेतला. सामोपचार योजनेपोटी कर्ज मुद्दल रु. २९,९८,५१७.००, व्याज रु. २०,१४,६७५.०० असे एकूण रु. ५०,१३,१९२.०० इतकी वसूली झाली. अहवाल साली एकूण रु. २१,७२,०६५.०० रक्कमेची सवलत देण्यात आली. तसेच आपल्या संस्थेत मोठ्या रक्कमेचे एकमेव कॅश क्रेडिट कर्ज आहे. सदरचे कर्ज सामोपचार योजनेमध्ये निकाली निघाल्यास संस्थेला मोठ्या प्रमाणात स्थैर्य येणार होते. करिता बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँकेचे अध्यक्ष मा. श्री. बेनॉल्ड डायस व संचालक मा. श्री. ब्रायन फुर्ट्याडो ह्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे आजी-माजी संचालक, समाजातील निवडक सामाजिक कार्यकर्ते व संबंधित कर्जदार ह्यांच्या उपस्थितीत पापडी जिमखाना येथे दि. ९ मार्च २०२४ रोजी विचारविनिमयासाठी सभा बोलविण्यात आली होती. सदर सभेत सकारात्मक चर्चा होऊन योग्य त्या नियम व कायद्याच्या अनुषंगाने सदर कॅश क्रेडिट कर्जासाठी सामोपचार योजना देण्यात यावी असे ठरले व त्याची पूर्तता संबंधित कर्जदारांनी संस्थेमध्ये जाऊन करावी असा निर्णय घेण्यात आला. मात्र तद्नंतर संबंधित कर्जदारांकडून कोणताही अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे संबंधित कर्ज खाते अजूनही चालू आहे. तसेच कर्ज मर्यादा उल्लंघन करून दिलेल्या कर्जखात्यासही कर्ज सामोपचार योजनेत समाविष्ट करणेचे दृष्टीने आपण ठराव पारित करत आहोत, त्यास आपण मंजूरी द्यावी.

## थकीत कर्जे वसूली / कोर्ट प्रकरणे

१० ते १५ वर्षांपूर्वी दिली गेलेली कर्जे वसूलीसाठी अनेक अडचणी येत आहेत. तरीसुद्धा संस्थेचे वसूली अधिकारी व कर्मचारी योग्य पाठपुरावा करून कर्ज वसूल करत आहेत, त्यांचे अभिनंदन. परंतु काही कर्ज प्रकरणे नियमबाह्य पत पात्रता न पाहता अनियमितता, उपविधीचे उल्लंघन करून दिली गेली आहेत. २००८-२००९-२०१२-२०१३ / २०१६-२०१७ त्यामुळे संस्थेचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा कर्ज प्रकरणी कलम ८३ अन्वये चौकशी करण्यात आली. त्यामध्ये सुमारे २ कोटी १३ लाख रुपयाचे संस्थेचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पालघर मा. श्री. शिरीष कुलकर्णी करत आहेत. चौकशी अंतिम टप्प्यात आहे. संस्थेची आर्थिक नुकसानीची वसूली माजी संचालक, कर्मचारी व जनरल मॅनेजर यांच्याकडून वसूल करण्यात येणार आहे.

- **मान. श्रीमती सुनिता मुंडे : सहा. निबंधक प्रशासन सहकारी संस्था पालघर २०२०-२०२१** या कालावधीचे विशेष अहवालाच्या आधारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे **कलम ८३ ( १ ) व नियम ७१ ( १ )** तरतुदीनुसार चौकशी केली.
- **मान. श्री. सुधीर बांबरे : लेखा परिक्षक संस्था, पालघर २०१९-२० / २०-२१ / सन २०२१-२०२२** वकील फी चा खर्च संबंधित पदाधिकाऱ्यांनी व्यक्तिगत करावयास हवा होता, तो संस्थेमधून केलेला आहे व तो संबंधित पदाधिकाऱ्यांकडून वसुलीबाबत आदेश पारीत झालेला आहे.
- **चाचणी लेखापरिक्षण : २००५ ते २०१२** या कालावधीत वाटप केलेली सुमारे **१२००** थकीत वाहन रक्कम सुमारे **रु. ९ कोटी** या बाबतची वस्तुस्थिती पडताळणीसाठी श्री. सुधीर जीवन बांबरे, लेखापरिक्षक श्रेणी १, सहकारी संस्था पालघर ह्यांची नियुक्ती केली होती.

  त्या अनुषंगाने श्री. बांबरे यांनी

  १) चाचणी लेखापरिक्षण : सन २००५ ते सन २०२२

  २) प्रशासकीय अहवाल : सन २००५ ते सन २०२२

  ३) विनिर्दिष्ट अहवाल : सन २००५ ते सन २०२२

  सदर अहवाल विभागीय कोकण भवन येथे सादर केले. चाचणी लेखापरिक्षण अहवालामध्ये काही वाहन कर्ज प्रकरणी संस्थेचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे निदर्शनास आलेल्या त्रुटीबाबत अचूक चित्र उघडकीस आणण्यासाठी विनिर्दिष्ट अहवाल सादर केला. त्यामध्ये २००५-२०१२ या कालावधीत **४२३** बोगस वाहन कर्जे सुमारे रु. **३,४८,५९,९१९/-** कर्जदार श्री एस. एफ. ऑटो व तत्कालीन संचालक यांच्यात संगनमत करून संस्थेच्या सभासदांचा व ठेवीदारांचा विश्वासघात केल्याप्रकरणी एकूण ४४ जणांवर वसई पोलीस स्टेशनमध्ये जानेवारी २०२४ ला FIR दाखल करण्यात आला आहे.
- वरील तीनही अहवालानुसार संस्थेचे एकूण सुमारे १८ कोटी ५० लाख रूपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्या आर्थिक नुकसानीची वसूली संबंधित व्यक्तीकडून होण्याकामी महाराष्ट्र अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये श्री. टी. एम. काकडे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरिक्षण) मुंबई विभाग, नवी मुंबई करत आहेत. त्यामुळे लवकरच संस्थेची फार मोठी वसूली होणार आहे.

### शाखा स्थलांतर

सभासदांना आपले व्यवहार सुलभ व सोयीस्कर करता यावे म्हणून दि. १५ ऑक्टोबर २०२३ रोजी पहिल्या मजल्यावर असलेली मुळगाव शाखा डिव्हाईन रेसिडेन्सी, मुळगाव चर्चच्या बाजूला तळमजल्यावर स्थलांतरीत करण्यात आली. तसेच वासळई शाखेला मिळणारा अल्प प्रतिसाद व भाड्यापोटी होणारा खर्च ज्यादा असल्यामुळे संबंधित शाखा भक्ती पार्क, चणेबोरी, पापडी रोड येथे तळमजल्यावर स्थलांतरीत करण्यात आली.

### लेखा परिक्षण

संस्थेचे अहवाल सालचे अंतर्गत लेखा परिक्षण श्री. किरण शिंदे (चार्टर्ड अकौंटंट्स) यांनी पूर्ण केले आहे. त्याचप्रमाणे ३१ मार्च २०२४ अखेरचे वैधानिक लेखा परिक्षण मे. सुवर्णा गोखले अँड कंपनी (चार्टर्ड अकौंटंट) यांनी पूर्ण केले असून **संस्थेस ऑडिट वर्ग 'क' दिलेला आहे.** वैधानिक लेखा परिक्षकांचा अहवाल पान क्र. ९ वर छापलेला आहे. लेखा परिक्षण कालावधीत त्यांनी केलेल्या मार्गदर्शन व सुचनांबद्दल आम्ही आभारी आहोत.

### योग्य मापदंड न वापरता मागील संचालक मंडळाने वितरीत केलेल्या कर्जाची दि. ३१ मार्च २०२४ अखेरची वस्तूस्थितीदर्शक स्थिती :

सदरची कर्जे मोठ्या प्रमाणात थकीत असून मुदतबाह्य झालेली आहेत. त्याची वस्तूस्थितीदर्शक माहिती पुढील पानावर.

# संत जोजेफ को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सागरशेत, वसइ

## माजी संचालक मंडळाने योग्य मापदंड न वापरता वितरीत केलेल्या व अजूनही वसूल न झालेल्या थकीत कर्जाची वस्तूस्थिती

| कर्ज प्रकार | कर्ज प्रकार | कर्ज घेतल्यापासून झालेला कालावधी | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ४.५ ते १० वर्षे ५४ ते १२० महिने | १० ते १५ वर्षे १२१ ते १८० महिने | १५ ते २० वर्षे १८१ ते २४० महिने | २० ते २५ वर्षे २४१ ते ३०० महिने | २५ ते ३० वर्षे ३०१ ते ३६० महिने | ३० वर्षापुढे ३६१ महिने ते पुढे | |
| जामिनकी कर्ज | खाते संख्या | ७३ | ३३९ | १६७ | ९५ | ४६ | १ | ७२१ |
| | येणे कर्ज | ५९४३८१८ | २४३०८२४० | ९०४५०६५ | ३४६९६३५ | ८५७२१५ | ५३९० | ४३६२९३६३ |
| | येणे व्याज | ३८०४३५७ | ३५२७६७१५ | १७३४४६२० | ९०१८५९२ | २५२२७४५ | १७८७२ | ६७९८४९०१ |
| | एकूण येणे | ९७४८१७५ | ५९५८४९५५ | २६३८९६८५ | १२४८८२२७ | ३३७९९६० | २३२६२ | १११६१४२६४ |
| | केलेली एन.पी.ए. तरतूद | २९७१९०९ | १२१५४१२० | ४५२२५३३ | १७३४८१८ | ४२८६०८ | २६९५ | २१८१४६८३ |
| | **करावी लागणारी एन.पी.ए. तरतूद** | **२९७१९०९** | **१२१५४१२०** | **४५२२५३२** | **१७३४८१७** | **४२८६०७** | **२६९५** | **२१८१४६८०** |
| वाहन कर्ज | खाते संख्या | १ | ३०४ | ८७२ | १ | | | ११७८ |
| | येणे कर्ज | ७४२२७० | ३०५३६९८६ | ५६८८१२४१ | ५४१०५ | | | ८८२१४६०२ |
| | येणे व्याज | ४३१९५७ | ५६५३०१८६ | १२२४८७१६५ | १२६०४० | | | १७९५७५३४८ |
| | एकूण येणे | ११७४२२७ | ८७०६७१७२ | १७९३६८४०६ | १८०१४५ | | | २६७७८९९५० |
| | केलेली एन.पी.ए. तरतूद | ३७११३५ | १५२६८४९३ | २८४४०६२० | २७०५२ | | | ४४१०७३०० |
| | **करावी लागणारी एन.पी.ए. तरतूद** | **३७११३५** | **१५२६८४९३** | **२८४४०६२१** | **२७०५३** | | | **४४१०७३०२** |
| गहाण कर्ज | खाते संख्या | | २ | २ | | | | ४ |
| | येणे कर्ज | | १६९२७५४ | ९०५७०७ | | | | २५९८४६१ |
| | येणे व्याज | | २७६५३७५ | ४१५२१५ | | | | ३१८०५९० |
| | एकूण येणे | | ४४५८१२९ | १३२०९२२ | | | | ५७७९०५१ |
| | केलेली एन.पी.ए. तरतूद | | ३३८५५१ | १८११४१ | | | | ५१९६९२ |
| | **करावी लागणारी एन.पी.ए. तरतूद** | | **१३५४२०३** | **७२४५६६** | | | | **२०७८७६९** |
| कॅश क्रेडिट कर्ज | खाते संख्या | | | १ | | | | १ |
| | येणे कर्ज | | | १२५१५२२१ | | | | १२५१५२२१ |
| | येणे व्याज | | | १८९८११०१ | | | | १८९८११०१ |
| | एकूण येणे | | | ३१४९६३२२ | | | | ३१४९६३२२ |
| | केलेली एन.पी.ए. तरतूद | | | २५०३०४४ | | | | २५०३०४४ |
| | **करावी लागणारी एन.पी.ए. तरतूद** | | | **१००१२१७७** | | | | **१००१२१७७** |

## कर्मचारी वर्ग

अहवाल साली संस्थेमध्ये ६ अधिकारी, ७ लिपिक, तसेच ७ सबस्टाफ असे एकूण २० कायम कर्मचारी आहेत व ४ कंत्राटी कर्मचारी आहेत. कर्मचाऱ्यांनी एकंदरीत संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने चांगले योगदान दिलेले आहे, त्याची आम्ही नोंद घेत आहोत.

## तोटा

गतवर्षी संस्थेस रु. ७४,५२,४९१.५५ इतका तोटा झाला होता. कर्ज वसूलीचा कार्यक्रम प्रभावीपणे राबविल्यामुळे तो कमी होऊन अहवाल साली संस्थेला रु. २५,३७,०२०.०५ (अक्षरी रुपये पंचवीस लाख सदतीस हजार वीस पैसे पाच मात्र) इतका निव्वळ तोटा झालेला आहे. तसेच ह्यापूर्वी झालेला संचित तोटा रु. ३,५१,५१,२६३.१९ धरून अहवाल साल अखेरसंस्थेस एकूण रु. ३,७६,८८,२८३.२४ इतका संचित तोटा झालेला आहे. पुढील सन २०२४-२५ मध्ये आपण नफ्यामध्ये येऊ असे दृष्टीपथास येत आहे. त्यामुळे ह्यापुढे संचित तोटा निकालात निघून संस्था लवकरच नफ्यामध्ये येईल असे आम्हांस वाटते.

## तरतुदी

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ६५ (१) अन्वये आवश्यक अशा खालीलप्रमाणे तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शासकीय व अंतर्गत लेखापरिक्षण फी | रु. | २,००,०००.०० |
| २) | सेवक ग्रॅच्युईटी | रु. | ३,५०,०००.०० |
| ३) | टॅक्स ऑडिट व जीएसटी रिटर्न | रु. | ५०,०००.०० |
| ४) | स्थिरीकरण तरलता निधी | रु. | २,८०,०००.०० |
| | | **रु.** | **८,८०,०००.००** |

## निवडणूक निधी

आपल्या संस्थेची पंचवार्षिक निवडणून सन २०२३ ते २०२८ सालाकरीता दि. २६-२-२०२३ रोजी पार पडली. निवडणूक प्राधिकरणाने सदर निवडणूक खर्चासाठी रु. १४.५० लाख निधी संस्थेस जमा करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे संस्थेने ती रक्कम निवडणूक प्राधिकरणाला अदा केली. निवडणूक प्राधिकरणाकडे जादा अदा केलेली रक्कम परत मिळणेसाठी अध्यक्ष व संचालक मंडळाने विशेष पाठपुरावा केल्यामुळे आपणास **रु. ४,७०,८९७.००** इतकी रक्कम परत मिळाली आहे. ही बाब आपल्या दृष्टीने आनंददायी आहे.

## सहकार्य व मार्गदर्शनाबाबत आभार

१) मा. श्री. मिलींद भालेराव, विभागीय निबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई.
२) मा. श्री. शिरीष कुलकर्णी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पालघर.
३) मा. श्री. सुहास पवार, जिल्हा विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, पालघर.
४) मा. श्री. अमर शिंदे, उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई आणि त्यांचे सहकारी.
५) वैधानिक लेखा परिक्षक मे. सुवर्णा गोखले ॲन्ड कं. (चार्टर्ड अकौंटंट), बोईसर.
६) अंतर्गत लेखा परिक्षक मे. किरण शिंदे ॲन्ड कं. (चार्टर्ड अकौंटंट).
७) बॅसीन कॅथॉलिक बँकेचे अध्यक्ष मा. श्री. बेनॉल्ड डायस व संचालक मा. श्री. ब्रायन फुर्टाडो
८) तसेच संस्थेस सहकार्य करणाऱ्या सर्व बँकांचे अधिकारी व कर्मचारी, संस्थेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक, संस्थेचा कर्मचारी वर्ग.

आपणा सर्वांनी केलेल्या विविध प्रकारच्या सहकार्याबद्दल आपले आणि ज्यांचा ज्यांचा संस्थेच्या प्रगतीसाठी मोलाचा हातभार लागलेला आहे त्या सर्वांचे तसेच माझे सहकारी मा. व्हा. चेअरमन श्री. संजय वर्तक व सर्व संचालक मडंळ सदस्य ह्यांचे मन:पूर्व आभार मानतो. संस्थेवरील आपला विश्वास, प्रेम व लोभ असाच वाढत राहो ही नम्र विनंती. धन्यवाद.

**जय सहकार!**

दिनांक : २० जुलै २०२४
सागरशेत, वसई ४०१ २०७

आपला विश्वासू,
**श्री. लिनस निकलस डिकुना**
अध्यक्ष, संचालक मंडळाच्या वतीने.

# ☆ लेखा परिक्षकाचा अहवाल ☆

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९(३) अन्वये)

आम्ही, **संत जोजेफ को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.**, कृपा अपार्टमेंट, सागरशेत रोड, वसई, जि. पालघर यांचे विवरणाचे लेखापरीक्षण केले आहे. त्यामध्ये ताळेबंद पत्रक दि. ३१ मार्च २०२४ चे ताळेबंद पत्रक व सन २०२३-२४ या वर्षाचे नफा-तोटा पत्रक आणि हिशोबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेल्या शेऱ्यास अधीन राहून आम्ही दि. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंतचे लेखापरीक्षण केले आहे.

**१ ) आर्थिक पत्रकाबाबतची व्यवस्थापनाची जबाबदारी :**

सदर आर्थिक पत्रके महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० सहकारी संस्था नियम तसेच संस्थेचे पोटनियम यानुसार तयार करणे ही संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असून यामध्ये पत्रके ढोबळ प्रमाणात दोष विरहीत तयार करण्याच्या दृष्टीने अंतर्गत नियंत्रणाची रचना करणे, तसेच अंमलबजावणी करणे यांचा समावेश होतो.

**२ ) लेखापरिक्षकाची जबाबदारी :**

आर्थिक पत्रकांवर आमच्या लेखापरिक्षणावर आधारीत मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही केलेले लेखापरीक्षण भारताच्या सर्वमान्य असलेल्या लेखापरिक्षणाच्या प्रमाणकास अनुसरून आहे. द इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकांऊट्स ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे या सर्वसामान्य प्रमाणकानुसार ही आर्थिक पत्रके ढोबळ प्रमाणात दोष विरहीत असल्याची रास्त खात्री मिळण्याच्या दृष्टीने आम्ही लेखापरिक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

आर्थिक पत्रकात दर्शविलेले तपशील व त्यांच्या रक्कमा तसेच सांख्यकीय व इतर माहिती या संदर्भातील पुरावा मिळवण्याच्या दृष्टीने लेखापरिक्षण पद्धतीचा अवलंब करणे याचा लेखापरिक्षणात समावेश आहे. लेखापरिक्षण पद्धतीची निवड आर्थिक पत्रकांतील चुकांच्या, धोक्यांच्या शक्यतेबद्दलचा लेखापरिक्षणाचा अंदाज यावर अवलंबून आहे. अशा धोक्याचा अंदाज बांधताना रास्त परिस्थिती दर्शविणारे आर्थिक पत्रके तयार करण्याच्या दृष्टीने व्यवस्थापनाने केलेले महत्त्वाचे अंदाज व अवलंब केलेली लेखातत्त्वे यांचे निर्धारण करणे तसेच आर्थिक पत्रकांच्या सर्वसाधारण सादरीकरणाचे मुल्यमापन करणे यांचाही लेखापरिक्षणात समावेश आहे. आम्ही केलेले लेखापरिक्षण हे आमच्या मतप्रदर्शनासाठी रास्त आधार असल्याचा आमचा विश्वास आहे.

**३ ) अभिप्राय :**

आमच्या मते आम्हांस मिळालेल्या पूर्ण माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेने हिशोब व एकत्रित दिलेल्या टिपणी व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चा कायदा आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ आणि इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थांसाठी निबंधकाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारण वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार व लेखापरिक्षण अहवालातील विभाग अ ब क मधील शेऱ्यास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

अ) ताळेबंद पत्रकाच्या बाबतीत दि. ३१ मार्च २०२४ ची संस्थेची स्थिती आणि

ब) नफा आणि तोटा पत्रकाच्या बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शवीत आहे.

**४ ) इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा पत्रक तयार केलेले आहे.

**५ ) आम्ही अहवाल देतो की,**

अ) लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे माहिती व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत व ते पुरेसे आहेत.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारांत करण्यात आले आहेत.

क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य व परिपूर्ण आहेत.

६) आमच्या लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा पत्रक यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

७) आम्ही आणखी अहवाल देतो की,

१) या अहवाला संदर्भात ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक हे हिशोबी पुस्तके आणि विवरणपत्रकानुसार जुळतात.

२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानुसार संस्थेने योग्य ती हिशोबी पुस्तके ठेवली आहेत.

३) संस्थेच्या हिशोबांची तपासणी करून कार्यालयाकडून आलेले अहवाल हे आमच्या लेखापरीक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेण्यात आलेले आहेत.

४) संस्थेस चालू लेखापरीक्षण वर्षासाठी ऑडीट "**क**" वर्ग देण्यात येत आहे.

स्थळ : वसई — **( मे. सुवर्णा गोखले ॲण्ड कं.**, C.A. **)**

दिनांक १९-७-२०२४ — वैधानिक लेखापरिक्षक, पॅनल क्र. १०१२८४४

# संत जोजेफ को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## दि. ३१ मार्च २०२४ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | जबाबदाऱ्या व देणी | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ५,००,००,०००.०० |
| ३,१३,७९,३९०.०० | वसूल झालेले भाग भांडवल | | ३,१६,३९,४७०.०० |
| | **राखीव व इतर निधी** | | |
| २,३६,३८,०८५.९६ | वैधानिक राखीव निधी | २,३७,६७,२५१.०० | |
| ८,७०,००,०००.०० | बुडीत व संशयित कर्ज निधी | ९,२५,००,०००.०० | |
| १,१८,२२,३९१.०४ | इमारत निधी | १,१८,२२,३९१.०० | |
| ५५,००,०००.०० | गुंतवणूक घसारा निधी | ---- | |
| ---- | स्थिरीकरण तरलता निधी | २,८०,०००.०० | |
| १,२५,०००.०० | उत्तम जिंदगीवरील तरतुद निधी | १,२५,०००.०० | |
| **१२,८०,८५,४७७.००** | | | **१२,८४,९४,६४२.००** |
| | **सभासद ठेवी** | | |
| ५,९२,६८,९९६.७५ | बचत ठेवी | ५,९७,५३,२८८.४१ | |
| ७८,५७,२९२.९० | आवर्त ठेवी | ५६,६७,५१३.९० | |
| १३,५७,९३२.०० | ३० दिवस मुदत ठेवी | २२,४३,१७९.०० | |
| २,८१,४४,९२३.०० | मासिक व्याज मुदत ठेवी | ३,१३,०१,५४२.०० | |
| २,५८,६५,५३३.०० | तिमाही व्याज मुदत ठेवी | ४,१२,४६,८८९.०० | |
| १९,५३,३३,१५६.०० | एकत्रित व्याज मुदत ठेवी | १३,७६,५३,०३६.०० | |
| १२,१६३.०० | दामदुप्पट ठेवी | १२,१६३.०० | |
| ३,७२,३४९.३४ | चालू ठेवी | ४,०४,५४४.३४ | |
| **३१,८२,१२,३४५.९९** | | | **२७,८२,८२,१५५.६५** |
| ४७,७६,७७,२१२.९९ | बेरीज पुढील पानावर | | ४३,८४,१६,२६७.६५ |

| ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | मालमत्ता व येणी | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ९,४८,१६३.०० | **रोख व बँक शिल्लक** | | १८,२६,४६८.०० |
| | **बँक शिल्लक** | | |
| ३५,८११.०८ | स्टेट बँक चालू खाते | १५,१२१.०८ | |
| ९,६३,८५०.२४ | बॅसीन कॅथॉ.बँक (चालू ठेव) | ३२,६९,९९८.९५ | |
| २०,१२,८७३.५७ | ठाणे जि.म.स.बँक (बचत ठेव) | १,५३,७५८.७७ | |
| ८,०४२.९८ | न्यू इंडिया स.बँक (बचत ठेव) | ८,१२२.९८ | |
| ६५,१८६.३९ | बॅसीन कॅथॉलिक बँक (बचत ठेव शाखा) | ६७,१७१.९९ | |
| ८,५६८.२० | अपना सह. बँक (बचत ठेव) | ८,७९७.२० | |
| १३,८४१.९९ | बॅसीन कॅथॉ. बँक (चालू ठेव) | १३,८४१.९९ | |
| ५,८०७.८४ | न्यू इंडिया सह. बँक (बचत ठेव मु.का.) | ५,८६५.८४ | |
| २२,७३४.०० | ग्रेटर बॉम्बे सह. बँक (बचत ठेव) | २३,४२६.०० | |
| १३,३०,०७९.७६ | बॅसीन कॅथॉलिक बँक (बचत ठेव मु.का.) | ३०,५२,३०१.१६ | |
| ४८,०४२.४० | मॉडेल सह.बँक (बचत खाते) | ४९,४९९.४० | |
| २,७२,३३५.३८ | वसई विकास सह.बँक (बचत खाते) | ३,४७,०२१.३८ | |
| ६,०९०.०० | बॅसीन कॅथॉलिक बँक (ग्रॅच्युईटी खाते) | ५,८१०.०० | |
| ६३,७४८.२८ | AU स्मॉल फायनान्स बँक (चालू खाते) | ६३,७४८.२८ | |
| ८२,६५०.०० | युनिटी स्मॉल फायनान्स बँक (चालू ठेव) | १३,४४४.८० | |
| **४९,३९,६६२.११** | | | **७०,९७,५७९.८२** |
| ५८,८७,८२५.११ | बेरीज पुढील पानावर | | ८९,२४,०४७.८२ |

# दि. ३१ मार्च २०२४ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | जबाबदाऱ्या व देणी | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ४७,७६,७७,२१२.९९ | बेरीज मागील पानावरुन | | ४३,८४,१६,२६७.६५ |
| | **न दिलेला लाभांश** | | |
| ९२,८८७.०० | लाभांश क्रमांक ३२ (१८-१९) | ---- | |
| ३०,६४८.०० | लाभांश क्रमांक ३३ (१९-२०) | ---- | |
| **१,२३,५३५.००** | | | ---- |
| ३६,४५,०४९.०० | कर्मचारी ग्रॅच्युईटी | | ---- |
| | **मागील तरतुदी व इतर देणी** | | |
| ४,२३०.०० | अनामत | ---- | |
| ६,७५०.०० | टी.डी.एस. | ---- | |
| २५,०३,६८२.०० | दागिना/ठेव/कॅश क्रेडीट येणे व्याज | ---- | |
| २५,०९४.०० | लवाद दावा सरचार्ज | ---- | |
| **२५,३९,७५६.००** | | | ---- |
| | **बँक ओव्हरड्राफ्ट** | | |
| २१,३२८.२६ | बॅसीन कॅथॉलिक बँक | २२,६०९.४० | |
| **२१,३२८.२६** | | | **२२,६०९.४०** |
| ११,१३,३३८.०० | प्रॉव्हिडंड फंड-मुदत ठेव गुंत. | | ११,७१,३८४.०० |
| १,६६,९७,४०७.०० | प्रॉव्हिडंड फंड-कार्यालय गुंत. | | ---- |
| | **शाखा खाते** | | |
| १,९७,६५,११८.५८ | वडवली शाखा | १,३२,५२,८०६.५८ | |
| ४,११,९४,७८५.९४ | मुळगाव शाखा | १,५१,२६,३८४.९४ | |
| ---- | मुख्य शाखा | १,४९,५९,०३४.९४ | |
| **६,०९,५९,९०४.५२** | | | **४,३३,३८,२२६.४६** |
| २७,१६,२९,३१३.०० | कर्ज रकमेवरील येणे व्याज | | **२९,५५,८८,७००.००** |
| ८३,४४,०६,८४३.७७ | बेरीज पुढील पानावर | | ७७,८५,३७,१८७.५१ |

| ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | मालमत्ता व येणी | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ५८,८७,८२५.११ | बेरीज मागील पानावरुन | | ८९,२४,०४७.८२ |
| | **गुंतवणुका व ठेवी** | | |
| ४,२५,६२,०८७.०० | ठाणे जिल्हा म.स.बँक (राखीव निधी) | ४,४९,०७,९०५.०० | |
| १२,३३,७४,३६७.०० | ठाणे जिल्हा म.स.बँक- मुदत ठेव | ३,४४,२५,४७६.०० | |
| १,३७,०९,०७२.०० | ठाणे जिल्हा म.स.बँक- इमारत निधी | १,४५,९९,२७६.०० | |
| १२,८५,२७१.०० | ठाणे जिल्हा म.स.बँक- उत्तम जिंदगी | १३,६९,०२९.०० | |
| ८४,४६९.०० | ठाणे जिल्हा म.स.बँक- घसारा निधी | ८९,५७९.०० | |
| ४२,१९,६३१.०० | बॅसीन कॅथॉलिक बँक (मुदत ठेव) | ४,७७,८७,२५३.०० | |
| ---- | युनिटी बँक प्रेफरेन्स शेअर्स | १,०१,९१,४४०.०० | |
| ---- | युनिटी बँक इक्विटी शेअर्स | २५,४७,८६०.०० | |
| १,३५,८८,९१६.०० | पंजाब व महाराष्ट्र बँक- मुदत ठेव | ---- | |
| **१९,८८,२३,८१३.००** | | | **१५,५९,१७,८१८.००** |
| | **शेअर्समधील गुंतवणूक** | | |
| १,०००.०० | ठाणे जिल्हा म.स.बँक-शेअर्स | १,०००.०० | |
| ३०००.०० | महाराष्ट्र राज्य फेडरेशन-शेअर्स | ३,०००.०० | |
| १,०००.०० | वसई ता.स.मुद्रणालय -शेअर्स | १,०००.०० | |
| २५०.०० | परशुराम हौ.सो. लि.-शेअर्स | २५०.०० | |
| ---- | कोकण विभाग नागरी सह.प.संघ | ५,०००.०० | |
| २,५००.०० | पश्चिम ठाणे जि.ना.प.फे.-शेअर्स | २,५००.०० | |
| **७,७५०.००** | | | **१२,७५०.००** |
| २०,४७,१९,३८८.११ | बेरीज पुढील पानावर | | १६,४८,५४,६१५.८२ |

# दि. ३१ मार्च २०२४ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | जबाबदाऱ्या व देणी | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ८३,४४,०६,८४३.७७ | बेरीज मागील पानावरुन | | ७७,८५,३७,१८७.५१ |
| | **तरतूदी** | | |
| २,५०,०००.०० | शासकीय व अंतर्गत लेखापरीक्षण फी | २५०२८४.०० | |
| ७५,०००.०० | ग्राहक मंच लवाद तरतूद | ---- | |
| ५०,०००.०० | टॅक्स ऑडिट तरतूद | ५०,०००.०० | |
| ४२,०२८.०० | बँक ताळमेळ पत्रक | ---- | |
| १,००,०००.०० | मुळगाव शाखा मालक ॲडव्हान्स | ---- | |
| ३,००,०००.०० | सेवक ग्रॅच्युईटी | ३,५०,०००.०० | |
| २,७६,०००.०० | वासळई शाखा भाडे | ---- | |
| ९,७९,३५४.०० | कर्मचारी शिल्लक रजा | ९,७९,३५४.०० | |
| **२०,७२,३८२.००** | | | **१६,२९,६३८.००** |
| ८३,६४,७९,२२५.७७ | बेरीज पुढील पानावर | | ७८,०१,६६,८२५.५१ |

| ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | मालमत्ता व येणी | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| २०,४७,१९,३८८.११ | बेरीज मागील पानावरुन | | १६,४८,५४,६१५.८२ |
| | **कर्जे** | | |
| १,२५,१५,२२१.०० | कॅश क्रेडीट कर्ज | १,२५,१५,२२१.०० | |
| ५३,४२,७६१.०० | स्टाफ कर्ज | ६६,३२,६३५.०० | |
| ३७,१४,३२७.०० | ठेव कर्ज (मुदत ठेव तारण) | २७,१२,७०४.०० | |
| ५९,०२,६६४.०० | दागिना कर्ज | ५१,५५,७१७.०० | |
| ६,५७,८१,४९४.०० | वैयक्तिक कर्ज (जामिनकी) | ६,०७,३९,१७६.०० | |
| ८,९५,७९,३५७.०० | वाहन कर्ज | ८,९०,९८,४५९.०० | |
| ४,३४,९४,६३०.०० | गहाण कर्ज | ४,६०,१६,३१६.०० | |
| १४,९९,६३५.०० | तारणी कर्ज | १४,२१,६०२.०० | |
| **२२,७८,३०,०८९.००** | | | **२२,४२,९१,८३०.००** |
| ६३,८२,४७५.०० | जमीन व इमारत | | ६०,६३,३५१.०० |
| ५,६५,५११.०० | फर्निचर व फिटींग | | ६,४७,७१६.०० |
| १,५१,४६९.०० | संगणक व इलेक्ट्रिक उपकरणे | | ३,४७,५६६.०० |
| ३,७१,७६८.०० | मोटार वाहन खाते | | ४,३०,२१४.०० |
| १८,५०५.०० | लायब्ररी खाते | | ---- |
| ११,१३,३३८.०० | प्रॉव्हीडंड फंड मुदत ठेव गुंतवणूक | | ११,७१,३८४.०० |
| १,६६,९७,४०७.०० | प्रॉव्हीडंड फंड कार्यालय गुंत. | | ---- |
| | **शाखा खाते** | | |
| २,२३,३२,०३४.४६ | वासळई शाखा | २,२५,२५,४७३.४६ | |
| ७६,९८,६५५.०० | तारभाट शाखा | २,०८,१२,७५३.०० | |
| ३,०९,२९,२१५.०६ | मुख्य कार्यालय | ---- | |
| **६,०९,५९,९०४.५२** | | | **४,३३,३८,२२६.४६** |
| ५१,८८,०९,८५४.६३ | बेरीज पुढील पानावर | | ४४,११,४४,९०३.२८ |

# दि. ३१ मार्च २०२३ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१ मार्च २०२२ रुपये पैसे | जबाबदाऱ्या व देणी | ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | रुपये पैसे | ३१ मार्च २०२२ रुपये पैसे | मालमत्ता व येणी | ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८३,६४,७९,२२५.७७ | बेरीज मागील पानावरुन | | ७८,०१,६६,८२५.५१ | ५१,८८,०९,८५४.६३ | बेरीज मागील पानावरुन | | ४४,११,४४,९०३.२८ |
| | | | | **२७,१६,२९,३१३.००** | कर्ज रकमेवरील येणे व्याज | | २९,५५,८८,७००.०० |
| | | | | | **इतर ॲडव्हान्सेस** | | |
| | | | | २,२५,०००.०० | शाखा मालक ॲडव्हान्स | ६०,०००.०० | |
| | | | | ९,५००.०० | दूरध्वनी सुरक्षा ठेव | ९,०००.०० | |
| | | | | १०,०००.०० | व.वि.म.पा.पाणीपट्टी डिपॉ. | ---- | |
| | | | | २३,१६८.०० | आगाऊ भरलेला विमा | ---- | |
| | | | | १६,२४०.०० | म.रा.वि.मं. सुरक्षा ठेव | १६,२४०.०० | |
| | | | | **२,८३,९०८.००** | | | **८५,२४०.००** |
| | | | | | **इतर मालमत्ता व येणी** | | |
| | | | | ४,१७०.०० | अधेसिव्ह स्टॅम्प | २,०१,५००.०० | |
| | | | | १,४३,२४२.०० | स्टेशनरी शिल्लक | १,३१,८८८.०० | |
| | | | | ३६,४५,०४९.०० | एल.आय.सी.ग्रुप ग्रॅच्युईटी स्कीम | ---- | |
| | | | | ३९,९५,३००.९९ | गुंतवणूकीवरील टीडीएस | ५१,०७,१२०.९९ | |
| | | | | ४२,०२८.०० | बँक ताळमेळ पत्रक फरक | ---- | |
| | | | | २५,०३,६८२.०० | दागिना/ठेव/कॅश क्रेडीट येणे व्याज | ---- | |
| | | | | **१,०३,३३,४७१.९९** | | | **५४,४०,५०८.९९** |
| | | | | २,७१,४१४.९६ | वस्तू व सेवा कर | | २,१९,१९०.०० |
| | | | | **३,५१,५१,२६३.१९** | **निव्वळ तोटा** | | |
| | | | | | मागील वर्षातील संचित तोटा | ३,५१,५१,२६३.१९ | |
| | | | | | चालू वर्षातील तोटा | २५,३७,०२०.०५ | **३,७६,८८,२८३.२४** |
| **८३,६४,७९,२२५.७७** | **एकूण बेरीज** | | **७८,०१,६६,८२५.५१** | **८३,६४,७९,२२५.७७** | **एकूण बेरीज** | | **७८,०१,६६,८२५.५१** |

**श्री. लिनस निकलस डिकूना**
अध्यक्ष

**श्री. पिटर डायगो डिसोजा**
महाव्यवस्थापक

**श्री. हेमंत पांडुरंग माळी**
सहाय्यक महाव्यवस्थापक

**मे. किरण शिंदे ॲन्ड कं.**
अंतर्गत लेखा परिक्षक

**मे. सुवर्णा गोखले ॲन्ड कं.**
वैधानिक लेखा परिक्षक

# संत जोजेफ को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## दि. १/४/२०२३ ते दि. ३१-३-२०२४ चे नफा तोटा पत्रक

| ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | खर्च | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे | ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | उत्पन्न | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| २,१०,३१,४४८.८१ | ठेवीवरील दिलेले व्याज | १,८२,४४,५९८.५१ | १,३४,९१,१६१.०० | कर्जावरील मिळालेले व्याज | १,४७,६४,६४२.०० |
| ४५,५०८.०० | बँक कर्जावरील दिलेले व्याज | ३,१०,९९१.२० | १,३९,५९,८५४.०० | बँक गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज | १,०७,३१,०३५.०० |
| ५७,८६,८५९.०० | पगार खर्च, भत्ते, भविष्यनिधी अंशदान | ६२,६३,४८८.०० | १५०.०० | सहकारी संस्थांच्या भागावरील लाभांश | १५०.०० |
| ३,४९,४९२.०० | ऑफीस भाडे, विमा व दिवाबत्ती | ४,८४,३२९.०० | ---- | युनिटी बँके प्रेफरेन्स शेअर्स लाभांश | २,०३,८२८.८० |
| १,४००.०० | संचालक मंडळ मिटींग भत्ता व चहापान | ७१,४००.०० | ६५,३५०.०० | नोटीस फी खाते | २,१४,७५१.०० |
| ७५०.०० | सोसायटी व्यवसाय कर | ७५०.०० | १,२७०.०० | लेट फी खाते | ७५९.०० |
| १८,५८८.०० | पोस्टेज खर्च | ३४,८७९.०० | ७,२९०.०० | प्रोसेसिंग फी | ७२,०००.०० |
| ५,६१,७१३.०० | इमारत व डेडस्टॉक घसारा | ५,७७,६१५.०० | ३६,६४०.०० | इतर फी | ६८,२४३.८० |
| १,४६,६०६.०० | प्रिन्टींग, स्टेशनरी व अहवाल छपाई | १,८८,०८१.०० | ---- | निवडणूक खर्च परतावा | ४,७०,८९७.०० |
| ७,२७१.०० | किरकोळ खर्च | ७,२८०.०० | | | |
| २,०२,६१६.०० | प्रवास खर्च | ८९,८८०.०० | | | |
| २,५००.०० | जाहिरात खर्च | २१,७५०.०० | | | |
| २,०८,२२७.०० | व्यवस्थापन खर्च | ९१,६८०.०० | | | |
| २२,११९.०० | टेलिफोन बिल | १४,६९२.०० | | | |
| ५१,०१९.०० | जनरल सभा खर्च | ५७,१९४.०० | | | |
| ६४,१२८.०० | घरपट्टी खर्च | ५०,४७३.०० | | | |
| ७,०००.०० | भविष्य निधी कन्सलटन्सी फी | ७,०००.०० | | | |
| २,२२,७३९.०० | ऑफीस खर्च | २,००,८७६.०० | | | |
| ३७,५९३.०० | भविष्य निधी सेवा शुल्क | ३७,५५६.०० | | | |
| ३,७११.०६ | बँक कमिशन / चार्ज / टॅक्स | ५,२५२.९८ | | | |
| ५,८३,१७३.०० | दुरुस्ती व देखभाल खाते | ८,०२,६६१.०० | | | |
| १,०३,४४०.०० | प्रशासन मंडळ मानधन | ---- | | | |
| ३३,७१४.६८ | कलम ८३ चौकशी फी | २०,०००.०० | | | |
| २०,०००.०० | ग्राहक मंच नुकसान भरपाई खर्च | ---- | | | |
| ५,१६०.०० | वसूली खर्च | ---- | | | |
| २,९५,१६,७७५.५५ | बेरीज पुढील पानावर | २,७५,८२,४२६.६९ | २,७५,६१,७१५.०० | बेरीज पुढील पानावर | २,६५,२६,३०६.६० |

# संत जोजेफ को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## दि. १/४/२०२३ ते दि. ३१-३-२०२४ चे नफा तोटा पत्रक

| ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | खर्च | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे | ३१ मार्च २०२३ रुपये पैसे | उत्पन्न | ३१ मार्च २०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| २,९५,१६,७७५.५५ | बेरीज मागील पानावरुन | २,७५,८२,४२६.६९ | २,७५,६१,७१५.०० | बेरीज मागील पानावरुन | २,६५,२६,३०६.६० |
| २,९००.०० | शिपाई गणवेश खाते | ---- | | | |
| १९,६१,७१२.०० | उत्तम जिंदगीवरील व्याज | ---- | | | |
| ४,१९,०००.०० | वकील फी | १,५०,०००.०० | | | |
| ४४,२५०.०० | इन्कमटॅक्स अपील व रिटर्न फाईल खर्च | ---- | | | |
| २३,८४३.०० | ऑडीट फी खर्च | ---- | | | |
| ---- | पतसंस्था संघ सभासदत्व प्रवेश फी | १००.०० | | | |
| ---- | शाखा स्थलांतर खर्च | १५,९८९.०० | | | |
| ---- | सेवक ग्रॅच्युईटी | ३,५७३.०० | | | |
| ---- | संचालक व कर्मचारी प्रशिक्षण | ४८,४६३.०० | | | |
| ---- | जीएसटी | ५२,२२४.९६ | | | |
| ---- | स्टॅम्प ड्युटी व रजिस्ट्रेशन | १४,५००.०० | | | |
| १६,०००.०० | मुल्यांकन खर्च | ---- | | | |
| १,७९,६११.०० | निवडणूक पोलीस संरक्षण | ---- | | | |
| ---- | कृपा अपार्टमेंट टेरेस शेड खर्च | ३,१६,०५०.०० | | | |
| ११५.०० | कर्मचारी कल्याण खर्च | ---- | | | |
| | **तरतुदी** | | | | |
| २,५०,०००.०० | शासकीय व अंतर्गत लेखापरिक्षण फी | २,००,०००.०० | ७४,५२,४९१.५५ | निव्वळ तोटा (ताळेबंदाकडे वर्ग) | २५,३७,०२०.०५ |
| १४,००,०००.०० | गुंतवणूक घसारा तरतूद (पीएमसी बँक) | ---- | | | |
| ३,००,०००.०० | सेवक ग्रॅच्युईटी | ३,५०,०००.०० | | | |
| ५०,०००.०० | टॅक्स ऑडीट व जीएसटी रिटर्न | ५०,०००.०० | | | |
| ---- | स्थिरीकरण तरलता निधी | २,८०,०००.०० | | | |
| २,४०,०००.०० | वासळई शाखा भाडे | ---- | | | |
| ६,१०,०००.०० | कर्मचारी शिल्लक रजा पगार | ---- | | | |
| **३,५०,१४,२०६.५५** | **एकूण बेरीज** | **२,९०,६३,३२६.६५** | **३,५०,१४,२०६.५५** | **एकूण बेरीज** | **२,९०,६३,३२६.६५** |

| श्री. लिनस निकलस डिकूना | श्री. पिटर डायगो डिसोजा | श्री. हेमंत पांडुरंग माळी | मे. किरण शिंदे अॅन्ड कं. | मे. सुवर्णा गोखले अॅन्ड कं. |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | महाव्यवस्थापक | सहाय्यक महाव्यवस्थापक | अंतर्गत लेखा परिक्षक | वैधानिक लेखा परिक्षक |

# संत जोजेफ को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## अंदाज पत्रक सन २०२४-२०२५

| तपशील ( खर्च ) | सन २०२३-२०२४ अंदाज रुपये पैसे | सन २०२३-२०२४ प्रत्यक्ष परिणाम रुपये पैसे | सन २०२४-२०२५ अंदाज रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ठेवीवरील व्याज | २,२५,००,०००.०० | १,८२,४४,५९८.५१ | १,८०,००,०००.०० |
| बँक कर्जावरील व्याज | २,४०,०००.०० | ३,१०,९९१.२० | ४,००,०००.०० |
| पगार, भत्ते, भविष्यनिधी अंशदान इ. | ७०,००,०००.०० | ६२,६३,४८८.०० | ६५,००,०००.०० |
| व्यवस्थापक समिती सभा भत्ते | ६०,०००.०० | ७१,४००.०० | ८०,०००.०० |
| प्रिन्टींग, स्टेशनरी व अहवाल छपाई | १,५०,०००.०० | १,८८,०८१.०० | २,००,०००.०० |
| इमारत व डेडस्टॉक घसारा | ६,५०,०००.०० | ५,७७,६१५.०० | ६,००,०००.०० |
| रिपेअर अँड मेन्टेनन्स | ६,००,०००.०० | ८,०२,६६१.०० | ६,००,०००.०० |
| जागा भाडे, कर, विमा व दिवाबत्ती खर्च | ६,००,०००.०० | ४,८४,३२९.०० | ५,००,०००.०० |
| वकील फी | २,००,०००.०० | १,५०,०००.०० | २,००,०००.०० |
| इतर खर्च | १०,००,०००.०० | १०,९०,१६२.९४ | १०,००,०००.०० |
| तरतूदी | २०,००,०००.०० | ८,८०,०००.०० | ४५,००,०००.०० |
| निव्वळ नफा | ---- | ---- | ---- |
| एकूण बेरीज | ३,५०,००,०००.०० | २,९०,६३,३२६.६५ | ३,२५,८०,०००.०० |

| तपशील ( जमा ) | सन २०२३-२०२४ अंदाज रुपये पैसे | सन २०२३-२०२४ प्रत्यक्ष परिणाम रुपये पैसे | सन २०२४-२०२५ अंदाज रुपये पैसे |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | १,५०,००,०००.०० | १,४७,६४,६४२.०० | २,२२,८०,०००.०० |
| बँक व्याज | १,३०,००,०००.०० | १,०७,३१,०३५.०० | ९०,००,०००.०० |
| इतर उत्पन्न | १,००,०००.०० | १०,३०,६२९.६० | ३,००,०००.०० |
| तोटा | ६९,००,०००.०० | २५,३७,०२०.०५ | १०,००,०००.०० |
| एकूण बेरीज | ३,५०,००,०००.०० | २,९०,६३,३२६.६५ | ३,२५,८०,०००.०० |